मा. औद्योगिक न्यायालय, पुणे यांनी तक्रार यु.एल.पी. क्र. ८९/१९९४ मध्ये दिनांक १८.१२.१९९७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत.
श्री. भानुदास हनुमंत गायकवाड

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.एस-३०/२०१०/प्र.क्र. ५३/फ-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० नोव्हेंबर, २०१७

वाचा : १. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-७/आस्था-३/प्र.क्र.२२(०३-०४)/१२६/१३-१४, दिनांक २६.०९.२०१३.
२. शासन पत्र क्र. एमएफएस-२०१५/प्र.क्र.१५२/फ-८, दिनांक ०८.१०.२०१५.

प्रस्तावना :-

जुन्नर वन विभागांतर्गत श्री. भानुदास हनुमंत गायकवाड, रोजंदारी मजूर यांनी त्यांना शासन सेवेत कायम करुन कायमपणाचे फायदे देण्यात यावेत याकरीता मा. औद्योगिक न्यायालय, पुणे येथे तक्रार युएलपी क्र. ८९/९४ दाखल केली होती. प्रकरणी मा. औद्योगिक न्यायालय, पुणे यांनी दिनांक १८.१२.१९९७ रोजी निर्णय दिला. त्याप्रमाणे तक्रारदारास शासनाची मान्यता प्राप्त करुन सेवेत कायम करण्यात यावे. त्यानुसार तक्रारदारास नियमितपणाचे सर्व फायदे देण्यात यावेत, असा निर्णय पारीत करण्यात आला. मा. औद्योगिक न्यायालय, पुणे यांनी दिनांक १८.१२.१९९७ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल करण्यास विधी व न्याय विभागाने मान्यता दिलेली नाही. विधी व न्याय विभागाच्या दिनांक ०२.१२.२०१६ च्या शासन परिपत्रकानुसार मा. न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याशिवाय पर्याय शिल्लक नसल्यामुळे मा. औद्योगिक न्यायालयाच्या दिनांक १८.१२.१९९७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता वनमजूराचे एक अधिसंख्य पद निर्माण करुन त्यांना देय असलेली थकबाकी देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मा. औद्योगिक न्यायालय, पुणे यांनी तक्रार युएलपी क्र. ८९/९४ मध्ये दिनांक १८.१२.१९९७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने वनमजूराचे एक अधिसंख्य पद निर्माण करुन श्री. भानुदास हनुमंत गायकवाड यांना दिनांक १८.१२.१९९७ पासून शासन सेवेत कायम करुन दिनांक १८.१२.१९९७ ते दिनांक ३१.०७.२०१७ पर्यंत अदा केलेली रक्कम वजा जाता देय असणारी थकबाकी रु.१५,११,४२१.२५/- (अक्षरी पंधरा लक्ष अकरा हजार चारशे एकवीस रुपये पंचवीस पैसे फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे .

सदरहू तक्रारदारांना अदा करावयाची थकबाकीची रक्कम अचूक असल्याची खातरजमा मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांनी करावी.

सदरहू खर्च मागणी क्रमांक सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर), ०१-वनीकरण, १०१ वनसंधारण व विकास, १०१ (१०) (१) वनमजूरांच्या अधिसंख्य पदांची निर्मिती (२४०६ १८९८) या लेखाशिर्षातंर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने आणि वित्त भागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २२३A/२०१७-व्यय/१०, दिनांक १५.०९.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२०१६२६१८८४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.11.20 16:30:05 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे.
५. उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर.
६. कार्यासन अधिकारी, व्यय- १०/अर्थ-६, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन अधिकारी, सा.प्र.वि./१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महालेखापाल-। (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०.फ-९ कार्यासन,महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ (निवड नस्ती)